ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतातील स्त्री उद्योजकता आणि आर्थिक सशक्तीकरण: एक विश्लेषणात्मक अभ्यास



**Mr. Mahendra Vitthal Bagul**
**Assistant Professor, Shahajiraje Mahavidyalaya**
**Khatav, 415505.**

**सारांश:**

भारतात अगदी प्राचीन काळापासूनच उद्योग क्षेत्र हे स्त्रियांच्या दृष्टीने एक उपेक्षित क्षेत्र मानले गेले आहे. परंतु आजच्या आधुनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात भारतासारख्या विकसनशील देशात अनेक स्त्रियांनी सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगात आणि आर्थिक सशक्तीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. स्त्री उद्योजकतेची व सशक्तीकरणाची पार्श्वभूमी, संकल्पना, आर्थिक सशक्तीकरणाशी असलेले परस्परसंबंध, भारतातील राज्यनिहाय स्थिती, संस्थात्मक पाठबळ, आर्थिक व सामाजिक आव्हाने, आणि आर्थिक सशक्तीकरणातीलयोगदान हेशाश्वत विकासातीलअत्यंत मोलाचे व उपयुक्त घटक ठरतात.प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील स्त्री उद्योजकता आणि आर्थिक सशक्तीकरणाचा सखोल विश्लेषणात्मक अभ्यास मांडण्यात आलेला आहे.

## १. प्रस्तावना

भारतीय समाजरचनेत स्त्रियांची भूमिका ऐतिहासिकदृष्ट्या घरगुती कार्यपूर्ती मर्यादित मानली जात होती. परंतु आधुनिक आर्थिक प्रक्रियेमुळे आज स्त्रिया उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या आहेत. आर्थिक स्वावलंबन हे स्त्री सशक्तीकरणाचे मुलभूत अधिष्ठान आहे. जेव्हा एखादी स्त्री स्वतः उत्पन्न निर्माण करते, तेव्हा तिची कुटुंबातील व समाजातील निर्णयक्षमता वाढते. त्यामुळे स्त्री उद्योजकतेचा अभ्यास केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने सुद्धा महत्वाचा ठरतो. स्त्री उद्योजकतेचा आर्थिक सशक्तीकरणाशी घनिष्ठ संबंध आहे. तसेच स्त्रियांचे उधोगातील सहभागामुळे रोजगारनिर्मितीसाठी देखील योगदान मिळते.

राज्यनिहायसहभागानुसार भारतातील ग्रामीण आणि शहरी भागातील कृषीपूरक अन्न प्रक्रिया उद्योग, हस्तकला, सेवा क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, स्वयंरोजगार आणि स्टार्टअप अशा सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांची वाढती उपस्थिती दिसून येते. तसेच शासनाच्या विविध योजना,बँकिंग सुविधा आणि वित्तपुरवठा संस्थांमुळे स्त्री उद्योजकतेला चालना मिळाली आहे. तथापि भांडवलाची कमतरता, तांत्रिक कौशल्याचा अभाव, सामाजिक बंधने, कुटुंबीय जबाबदाऱ्याआणि बाजारपेठेतील स्पर्धा ही आव्हाने अजूनही कायम आहेत. या सर्व अडचणीवरती मात करून स्त्रियांनी उद्योग क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे आधुनिक शाश्वत विकासाला चालना देऊन अर्थव्यवस्थेमध्ये जीडीपी व राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यात योगदान मिळाले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील स्त्री उद्योजकता आणि आर्थिक सशक्तीकरणाचा विश्लेषणात्मक आभास करण्यात येणार आहे

## २. स्त्री उद्योजकता आणि आर्थिक सशक्तीकरणाची पार्श्वभूमी:

भारतीय समाजरचनेत पूर्वीपासूनच परंपरेनुसार स्त्रियांची भूमिका ही फक्त घरगुती कामासाठी मर्यादितमानली जात होती. परंतु आजच्या आधुनिक व तांत्रिक युगामध्ये उद्योग आणि आर्थिक सशक्तीकरणात त्यांचा मोठा सहभाग वाढल्याने देशाच्या जीडीपी मध्ये वाढ झाली आहे. अलीकडील काळात उदारीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणामुळे सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांसाठी विविध नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. शासनाच्या विविध योजना, बँकिंग सुविधांमुळे स्त्रियांना उद्योग सुरु सारण्यासाठी आवश्यक असे पाठबळ मिळाले आहे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्न व शाश्वत विकासातही योगदान मिळते. म्हणून स्त्री उद्योजकता आणि आर्थिक सशक्तीकरण हे परस्परपूरक घटक असून आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये त्यांचे अधिक महत्व प्राप्त होत आहे.[२]

## ३. स्त्री उद्योजक आणि आर्थिक सशक्तीकरणाची संकल्पना:

- **स्त्री उद्योजकता:**
  “स्त्री उद्योजक ही अशी व्यक्ती असते जी स्वत:च्या मालकीचे उद्योग व्यवसाय सुरु करते आणि त्यांचे व्यवस्थापन करून आर्थिक जोखीम स्वीकारते.” स्त्री उद्योजकतेत आर्थिक स्वावलंबन, निर्णयक्षम तसेच सामाजिक स्थान वाढविण्याचा उद्देश असतो.[३]
- **आर्थिक साशाक्तीकारण:**
  “आर्थिक सशक्तीकरण ही उत्पन्ननिर्मिती, संसाधन नियंत्रण, वित्तीय निर्णयक्षमता व आर्थिक स्वायत्तता या घटकांचा समावेश असतो.” स्त्रियांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या  स्वावलंबी बनवून समाजात समानतेचा पाया मजबूत करण्यास मदत करते.[५]
- **स्त्री उद्योजक आणि आर्थिक सशक्तीकरण यातील स्परस्परसंबंध:**
  भारतात स्त्री उद्योजाकातेमुळे अनेक स्त्रियांची आर्थिक सक्षमता वाढते, ज्यामुळे त्यांचे सामाजिक परिस्थितीत निर्णयक्षमतेत सुधारणा होऊन आर्थिक सशक्तीकरण बळकट बनते. या दोन्ही संकल्पना आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या विकास प्रक्रियेत महत्वपूर्ण ठरतात.[४]

## ४. भारतातील स्त्री उद्योजकतेची स्थिती

भारतामध्ये स्त्रियांचा विविध उद्योग,व्यवसाय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचा सहभाग ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे दिसून येतो. ग्रामीण भागात हस्तकला, कृषी पूरक अन्न प्रक्रिया उद्योग, वस्त्रोद्योग,पर्यटन उद्योग, मासेमारी,कुकुटपालन, घरगुती उपक्रम, खादी  उत्पादने, तसेचशहरी भागातील माहिती तंत्रज्ञान, डिजिटल व्यापार, स्टार्टअप, सेवा उद्योग, लघु उद्योग, हॉटेल्स, सॉफ्टवेअर उत्पादन उद्योग, या मध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणत वाढला आहे.[६]

### ४.१ स्त्री उद्योजकतेनुसार प्रमुख राज्यनिहाय आढावा (ग्रामीण आणि शहरी आकडेवारीनुसार)

तक्ता क्र. १.१ (कोविड काळापासून ते २०२५ पर्यंत)

| राज्य | ग्रामीण प्रमुख उद्योग | शहरी प्रमुख उद्योग | ग्रामीण उद्योग संख्या | शहरी उद्योग संख्या | एकूण स्त्री उद्योजक संख्या | आर्थिक योगदान (करोड रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | हस्तकला, कापड उ. | माहिती तं., लघु उद्योग | ७,५०,००० | ४,४५,००० | ११,९५,००० | २,५०० |
| तमिळनाडू | वस्त्रउद्योग, फळभाजी | माहिती तं., डिजिटल वि. | ५,५०,००० | ४,०५,००० | ९,५५,००० | २,१०० |
| उत्तर प्र. | कृषी,अन्न प्र. घरेलू उ. | माहिती तं., पर्यटन उ. | ७,००,००० | ४,००,००० | ११,००,००० | २,३०० |
| कर्नाटक | हस्तकला, | माहिती तं., | ४,५०,००० | ४,००,००० | ८,५०,००० | १,८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कापड,कृषी | डिजिटल वि. | | | | |
| राजस्थान | हस्तकला, पर्यटन उ. | सेवा क्षेत्र, डिजिटल वि. | ४,५०,००० | २,५०,००० | ७,००,००० | १,५०० |
| आंध्र प्र. | हस्तकला, अन्नप्रक्रिया | माहिती तं., स्टार्टअप | ४,००,००० | २,८५,००० | ६,८५,००० | १,४०० |
| केरळ | हस्तकला, अन्नप्रक्रिया | सेवा क्षेत्र, डिजिटल वि. | २,८०,००० | १,७०,००० | ४,५०,००० | १,००० |
| पश्चिम बं. | हस्तकला, अन्नप्रक्रिया | लघु उद्योग, डिजिटल वि. | ५,००,००० | ३,२०,००० | ८,२०,००० | १.९०० |

**भारतातील प्रमुख महिला उद्योजक**
**तक्ता क्र. १.२**

| अ. क्र | नाव | पद | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | फल्गुनी नायर | संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी | nayakaसौंदर्य व लाइफस्टाइल ई-कॉमर्स |
| २. | किरण मझुमदार शॉ | कार्यकारी अध्यक्षा | Biocon |
| ३. | उपासना ताकू | सह संस्थापक व मुख्य अधिकारी | Mobikwikडिजिटल पेमेंट फायनटेक |
| ४. | वनिता सिंग | सह संस्थापक व मुख्य अधिकारी | Sugar Cosmetics सौंदर्य उत्पादन |
| ५. | श्रद्धा शर्मा | संस्थापक वमुख्यसंपादक | YourStoryडिजिटल स्टार्टअपसमुदाय |

## ४.२ संस्थात्मक पाठबळ

स्त्री उद्योजकताचा प्रभावी विकास आणि आर्थिक सशक्तीकरणासाठी फक्त व्यक्तिगत प्रयत्न पुरेसे नसतात. तर सरकारी आणि वित्तीय संस्थांद्वारे उपलब्ध केलेले. पाठबळ, प्रशिक्षण, कर्जपुरवठा, आणि बाजारपेठेत केलेले प्रवेश हे महत्वाचे घटक ठरतात. भारतामध्ये खालील प्रमुख संस्थात्मक स्रोत स्त्री उद्योजकतेस बळकटी देतात.

- भारतीय सूक्ष्म,लघु, आणि माध्यम उद्योग मांत्रालय(MSME Ministry)
- भारतीय सूक्ष्म,लघु, आणि माध्यम उद्योग मांत्रालय
- प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY)
- स्टँड अप इंडिया योजना
- राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (NRLM)
- भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) व व्यावसायिक बँका
- मुद्रा योजना (MUDRA Yojana)
- प्रशिक्षण आणि कौशल्य विकास - उदा. EDII, MSME
- नीती आयोग प्रशिक्षण ( NITI Aayog-WEP)
- राजीवगांधी महिला विकास योजना (RGMVP)
- महिला समृद्धी योजना
- महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVM)
- महिला बचत गट (SHG)
- अन्नपूर्णा योजना
- भारतीय लघु उद्योग विकास बँक

- स्त्री शक्ती योजना - भारतीय स्टेट बँक (SBI)
- NBFC आणि खास लघुउद्योग कर्ज

### विश्लेषण:

वरील दिलेल्या सर्व स्त्रीउद्योजकतेला चालनादेणाऱ्यावित्तीय व प्रशिक्षण संस्थां आहेत.यांच्या माध्यमातून भारतातील सूक्ष्म, लघु, आणि माध्यम क्षेत्रातीलस्त्री उद्योजकांनाबळकटी मिळते.कमीव्याजदरावर कर्ज व सुरक्षित प्रशिक्षण केंद्रांची उभारणी करूनग्रामीणआणिशहरी भागातील स्त्रियांना शाश्वतविकासाच्या दृष्टीने प्रोत्साहन देऊन आजच्या आधुनिक स्पर्धेतीउद्योग क्षेत्रात स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.[६]

### ४.३ आर्थिक व सामाजिक आव्हाने

भारतात सूक्ष्म, लघु, आणि माध्यम उद्योगामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढत्या प्रवृत्तीने दिसून येत असला तरी काही आर्थिक व सामाजिक आव्हानांना आजही स्त्रियांना तोंड द्यावे लागते आहे.

### पुरेशा भांडवलाचा अभाव -

अनेक स्त्रियांना अपर्याप्त, कमी, भांडवलाची उपलब्धता खाल्याने त्यांच्या व्यवसायाची व्याप्तीत वाढ होणे कठीण होते.

**तांत्रिक व व्यवस्थापन कौशल्यांची कमतरता** - काही स्त्री उद्योजकांना तांत्रिक आणि व्यवस्थापन कौशल्य अपर्याप्त असल्याने त्यांच्या उद्योगांचे सक्षम व्यवस्थापन करणे शक्य होत नाही. **बाजारपेठेतील वाढती स्पर्धा** - देशातील उद्योगांमध्ये अत्यंत स्पर्धात्मक वातावरण तयार झाल्याने स्त्रियांना आव्हान निर्माण करते.

**सामाजिक व सांस्कृतिक अडथळे** - रूढी, परंपरांचा पगडा सामाजिक दृष्ट्या वाढल्याने आर्थिक उद्योगात स्त्रियांना सक्रिय सहभागास मर्यादा येते.[१]

### ५.सशक्तीकरणात स्त्रियांचे योगदान

भारतात स्त्रियांचा उदयोग क्षेत्रीतील सहभागा बरोबरच आर्थिक सशक्तीकरणातही अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. आर्थिक विकास व रोजगार निर्मितीवर झालेला परिणाम अनेक क्षेत्रामध्ये दिसून येते. भारतात जवळपास सूक्ष्म, लघु, आणि माध्यम उद्योगांमध्ये सुमारे २०.३७ % स्त्रिया नेतृत्व करतात.

### ५.१ कुटुंबीय आर्थिक स्थैर्य

जेव्हा स्त्रिया स्वतःचे उत्पन्न मिळवतात तेव्हा घरगुती खर्च, शिक्षण, आरोग्य, आणि बचतीच्या निर्णयामध्ये त्यांचा प्रभाव वाढतो तसेच विविध सरकारी योजण्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. मुद्रा योजनेच्या माध्यमातून स्त्रियांना ६८ % कर्ज वाटप झाले आहे. त्यामुळे कुटुंबा बरोबरच सामाजिक व आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडून येते.[६]

### ५.२ रोजगार निर्मिती

स्त्री उद्योजकतेच्या नेतृत्वाखाली सुमारे २२-२७ दशलक्ष रोजगार निर्मिती होते. स्त्रियांच्या उद्योग वाढीमध्ये दरवर्षी सतत वाढ होत आहे.

### ५.३ सामाजिक परिवर्तन

भारतात स्त्री उद्योग बरोबरच महिला कामगारांची संख्या वाढून स्वयम रोजगारात सुद्धा सुमारे ४०.३ % वाढ झाली आहे. उद्योगामध्ये स्त्रियांचे नेतृत्व आणि आर्थिक नियंत्रण मिळाल्यामुळे स्त्रियांचे सामाजिक स्थानही सुधारत आहे.

### ५.४ राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात महत्वाचे योगदान देणारा घटक म्हणजे स्त्री उद्योजकता व सशक्तीकरण होय. जीडीपी मध्ये महिलांचा सुमारे १७ % योगदान देतात. तसेच MSMEs चीसंख्या वाढल्याने जिडीपीस चालना देतात. शाश्वत विकासाच्या दृष्टीने स्त्रियांचा सहभाग वाढल्यास जिडीपी मध्ये सुमारे १.५ % प्रती वर्षी वाढ होईल.[६]

## ६.स्त्री उद्योजकता आणि आर्थिक सशक्तीकरणाचे शाश्वत विकासातील महत्त्व

भारतात उद्योजकता व सशक्तीकरणाच्या दृष्टीने आर्थिक शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी स्त्रियांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. SDG ५ आणि SDG ८ मध्ये सतत वाढ होऊन रोजगार निर्मिती, कौशल्य विकास व सामाजिक समावेशनाला बळकटी येऊ शकते. रोजगार संधीचा विचार करता भारतात सुमारे २२-२७ दशलक्ष लोकांना स्त्रियांच्या नेतृत्वाखाली MSMEs मध्ये रोजगार मिळतो. त्यामुळे सामाजिक समावेशन व आत्मनिर्भरता वाढते.

घरगुती अर्थव्यवस्थेच्या उन्नती मध्ये शिक्षण, आरोग्य,उपभोग क्षमतेत वाढ करून जीवन स्तरावर सुधारणा होते. ज्याचा परिणाम सामाजिक व आर्थिक विकास घडून येतो. शाश्वत विकासाच्या दृष्टीने महिलांचे स्थानीय संसाधन वापर हा पर्यावरणपूरक प्रक्रियांचा अवलंब आणि समुदाय आधारित दृष्टिकोन हा भविष्यातील टिकाऊ अर्थव्यवस्थेचा एक घटक बनतो.[६]

## ७. निष्कर्ष:

भारतातील स्त्री उद्योजकता ही आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची शक्ती बनली आहे. तसेच सूक्ष्म, लघु. आणि माध्यम उद्योगांमध्ये महिलांचा वाढता सहभाग आणि स्वावलंबन त्याचबरोबर निर्णयक्षमता व सामाजिक स्थान मजबूत करते. भारत सरकारच्या विविध योजना व वित्तीय संस्थांच्या सहकार्यामुळे स्त्रियांना उद्योग सुरु करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाठबळ मिळाले आहे. तसेच भांडवलाची कमतरता, कौश्यल्याचा अभाव आणि सामाजिक बंधने हि आव्हाने अजूनही अस्तित्वात आहेत. सरकारी धोरणे, प्रशिक्षण आणि आर्थिक साहाय्य यांच्या माध्यमातून स्त्री उद्योजकतेला अधिक चालना दिल्यास शाश्वत विकास घडून रोजगार निर्मितीला आणि राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यास चालना मिळेल.

## संदर्भसूची :

१. देसाई, वसंत. (२०१३). *लघुउद्योग व उद्योजकता विकास.* हिमालय पब्लिकेशन हाऊस, मुंबई.
ISBN: ९७८-९३-५०९७-२०६-५
२. वेबसाईट: https://www.himpub.com
गुप्ता, सी. बी. व श्रीनिवास, एन. पी. (२०१४). *उद्योजकता विकास.* सुलतान चंद अँड सन्स, नवी दिल्ली.
ISBN: ९७८-८१-८०५४-१३७-५
वेबसाईट: https://www.sultanchandandsons.com
३. खांका, एस. एस. (२०१६). *उद्योजकता विकास आणि व्यवस्थापन.* एस चंद पब्लिकेशन,नवी दिल्ली.
ISBN: ९७८-९३-५२५३-०७७-५
वेबसाईट: https://www.schandpublishing.com
४. हिसरीच, रॉबर्ट डी. पीटर्स, मायकेल पी. व शेफर्ड, डीन एन. (२०१७). *उद्योजकता.* मॅकग्रा हिल एजुकेशन. नवी दिल्ली.
ISBN: ९७८-९३-५२६०-३९५-०
वेबसाईट: https://www.mheducation.co.in
५. कुमार, ए. (२०१२). *भारतातील महिला उद्योजकता.* रिंगल पब्लिकेशन, नवी दिल्ली.
ISBN: ९७८-८१-८४८४-२३१-७
वेबसाईट: https://www.regalpublications.com
६. Reserve Bank of India (RBI) *(महिला कर्जवाटप व वित्तीय समावेशन माहिती)* संकेतस्थळ:
https://www.rbi.org.in , Ministry of Finance, Government of India (PMMY)
**संकेतस्थळ**: https://www.mudra.org.in, National Rural Livelihoods Mission (NRLM) Progress Report *(महिला*SHG ***वकुटुंबीयउत्पन्नवाढ*** **संकेतस्थळ**:https://aajeevika.gov.in